महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९१२३९१४००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक : १४४२(अ)/मशिसेमविप/२०१७/२४ दिनांक:- २३ जानेवारी, २०२४

## -: प्रसिध्दीपत्रक :-

**विषय :- महाराष्ट्र शिक्षण (प्रशासन शाखा) गट-ब मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा-२०१७ मधील महाराष्ट्र शिक्षण सेवा (MES) संवर्गाच्या प्रतीक्षायादीवरील उमेदवाराच्या शिफारशीबाबत**
**संदर्भ :- जाहिरात क्रमांक -४० /२०१७**

शासनाच्या दिनांक ०८ जानेवारी, २०२४ रोजीच्या पत्रान्वये मागणी केल्यानुसार महाराष्ट्र शिक्षण (प्रशासन शाखा) गट-ब मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा-२०१७ मधील महाराष्ट्र शिक्षण सेवा (MES) संवर्गाच्या (जाहिरात क्र. ४०/२०१७) प्रतीक्षायादी मधून एका उमेदवाराची शिफारस शासनास करण्यात येत आहे.

२. प्रस्तुत पदाकरिता आयोगाने ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविले होते. अर्जासोबत उमेदवाराच्या अर्हतेबाबत कोणतीही प्रमाणपत्रे मागविण्यात आली नव्हती. मुलाखतीवेळेस उमेदवाराच्या दाव्यांची तपासणी त्यांनी सादर केलेल्या प्रमाणपत्रांआधारे करण्यात येऊन मुलाखती घेण्यात आल्या आहेत. तथापि, शिफारसपात्र उमेदवाराची प्रस्तुत पदासाठीची पात्रता तसेच त्यांचे गोपनीय अभिलेख, सदर परीक्षेच्या शासन परिपत्रकात नमूद केलेल्या तरतूदीनुसार नियुक्तीपूर्वी शासनस्तरावर तपासण्याच्या अधीन राहून सदर निकाल प्रसिध्द करण्यात येत आहे. प्रस्तुत तपासणीअंती अपात्र ठरणा-या उमेदवाराची उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

३. प्रस्तुत अंतिम निकाल हा विविध मा. न्यायालय/ मा. न्यायाधिकरण येथे दाखल करण्यात आलेल्या न्यायिक प्रकरणांवरील अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहून जाहीर करण्यात आला आहे.

४. उमेदवाराच्या माहितीसाठी प्रतीक्षायादीतून शिफारसपात्र ठरलेल्या उमेदवाराचे नाव आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहे.

**उप सचिव (परीक्षोत्तर अराजपत्रित)**
**ठिकाण - नवी मुंबई** **महाराष्ट्र लोकसेवा आयोग, नवी मुंबई**